कै. दिगंबर पांडुरंग तेजम, शिपाई, रेशीम अंडीपुंज निर्मिती केंद्र, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर यांचे घरबांधणी अग्रीमावरील शिल्लक व्याजाची रक्कम माफ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

वस्त्रोद्योग विभाग

शासन आदेश क्रमांकः सपववि-४००१२/२४/२०२६-DESKSERICULTURE

१४ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०००३

दिनांक :- ०५ ऑगस्ट २०२६

<u>वाचा</u>:- १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:घबांअ-२०२३/प्र.क्र.३१/२०२३/विनिमय, दि.०१.०३.२०२४

२) संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर यांचे पत्र क्र.रेशीम/कार्या-२/लेखा-२/ घबांअ/व्याज/माफी/२०२६-२७/८८९, दि.२४.०७.२०२६.

शासन आदेश :-

रेशीम अंडीपुंज निर्मिती केंद्र, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर येथील कै. दिगंबर पांडुरंग तेजम हे दि.०९.०४.१९९१ रोजी शिपाई पदावर शासन सेवेत नियुक्त झाले होते. रेशीम संचालनालयाच्या दि.१६.०७.२००५ रोजीच्या आदेशान्वये त्यांना घरबांधणी अग्रीमपोटी रु.१,५७,०००/- (रुपये एक लाख सत्तावन्न हजार फक्त) इतकी रक्कम मंजूर करण्यात आली होती. सदर घरबांधणी अग्रीमाची संपूर्ण मुद्दल रक्कम त्यांच्या वेतनातून विहितप्रमाणे वसूल करण्यात आलेली आहे. त्यानंतर त्यांचे दि.१०.०११.२०२३ रोजी शासन सेवेत असताना निधन झाले. त्यांच्या निधनानंतर घरबांधणी अग्रीमावरील व्याजाची रु.१,०२,०२८/- (रुपये एक लाख दोन हजार अठ्ठावीस फक्त) इतकी रक्कम वसूल होणे बाकी राहिलेली आहे.

२. वाचा क्र.१ मधील शासन निर्णयातील परिच्छेद क्र.७(१०) मधील तरतुदीनुसार शासन सेवेत कार्यरत असताना निधन झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या घरबांधणी अग्रीमावरील शिल्लक व्याजाची रक्कम माफ करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार, सदरहू प्रकरणी उपरोक्त तरतुदींचा विचार करून कै. दिगंबर पांडुरंग तेजम, शिपाई, रेशीम अंडीपुंज निर्मिती केंद्र, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर यांच्या घरबांधणी अग्रीमावरील शिल्लक व्याजाची रक्कम रु.१,०२,०२८/- (रुपये एक लाख दोन हजार अठ्ठावीस फक्त) माफ करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. हा शासन आदेश वित्त विभागाच्या शासन निर्णय, दि.०१.०३.२०२४ मधील परिच्छेद क्र.७(१०) मध्ये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०५१७००५४६५३६ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by PAWAR TUSHAR PITAMBAR
Date: 2026.08.05 17:01:52 +05'30'

(डॉ.तुषार पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२) महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
३) संचालक (रेशीम), रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
६) मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) सचिव (वस्त्रोद्योग) यांचे स्वीय सहायक, वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
८) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/कोल्हापूर.
९) रेशीम अंडीपुंज निर्मिती केंद्र, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर
१०) निवड नस्ती (रेशीम कक्ष)